आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२२ जून २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानपरिषदेच्या ११ जागांपैकी १० जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी

- विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला प्रारंभ/ ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर

- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातले ६ खासदार आज एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार

- बेस्ट उपक्रमातल्या कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप मागे

**आणि**

- नीट फेरपरीक्षेत पेपर फुटल्याचं वृत्त एनटीएने फेटाळलं

**<><><><>**

विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले.

अकरापैकी दहा जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले असून नाशिकच्या एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाला, तर सहा जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडले गेले, त्यामुळे **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींद्वारे निवडल्या जाणाऱ्या** विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीत १७ पैकी १६ जागा जिंकत महायुतीने दणदणीत विजय मिळवला आहे. महाविकास आघाडीला एकही जागा जिंकता आली नाही.

**नांदेड** मतदारसंघात काँग्रेसमधून भाजपात आलेले अमरनाथ राजुरकर यांचा मोठ्या फरकाने विजय झाले. **त्यांचे प्रतिस्पर्धी महाविकास आघाडीचे उमेदवार कृष्णा पाटील आष्टीकर यांना केवळ ८४ मतं मिळाली**. **सांगली सातारा** मतदारसंघातून भाजपाचे धैर्यशील कदम, **भंडारा गोंदिया मधून** अविनाश ब्राह्मणकर, **छत्रपती संभाजीनगर - जालना मधून** सुहास शिरसाट, **जळगाव** मधून नंदकिशोर महाजन, **सोलापूर** राजेंद्र राऊत, **अमरावती** प्रवीण पोटे तर **लातूर-बीड-धाराशिव** मतदारसंघातून काँग्रेसमधून भाजपात आलेले बसवराज पाटील विजयी झाले आहेत. **नागपूर** मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपाच्या

राजीव पोतदार यांनी विजय मिळवला. तर **परभणी-हिंगोली** मतदारसंघातून शिवसेनेचे सईद खान विजयी झाले.

**नाशिक** मतदारसंघातून शिवेसेनेचे नरेंद्र दराडे यांना पराभवाचा सामना करावा लागला. भाजपा नेते गणेश गिते यांचे बंधू गोकुळ गिते हे अपक्ष म्हणून तिथून निवडून आले.

या निवडणुकीत सहा उमेदवार याआधीच **बिनविरोध** निवडून आले आहेत.

**<><><><><>**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आज मुंबईत सुरुवात झाली.

सुरवातीला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नवनिर्वाचित सदस्य सुनेत्रा पवार आणि अक्षय कर्डिले यांना सदस्यत्वाची शपथ दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन २०२६-२७ च्या पुरवणी मागण्या सादर केल्या. अल निनो प्रभावामुळे नैऋत्य मान्सून पावसाला विलंब झाल्यानं राज्याच्या विविध भागांत पाणीटंचाई निर्माण झाल्याचा मुद्दा काँग्रेस नेते नाना पटोले यांनी सभागृहात उपस्थित केला. त्यावर योग्य चर्चा घडवून आणायचं आश्वासन अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलं. याबाबत पटोले यांनी विधानभवन परिसरात वार्ताहरांना सांगितलं....

**होल्ड- बाईट- पटोले**

दिवंगत आशा भोसले, सुमन कल्याणपूर, माजी मंत्री अनंतराव थोपटे, विठ्ठलराव धोटे, बळीराम कोटकर-पाटील, कृष्णराव देशमुख, पटल्या मावसकर, वसंतराव सूर्यवंशी, सुरेशकुमार जेथलिया, उषादेवी जगदाळे आणि शकुंतला शर्मा यांना सभागृहाने श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**विधानपरिषदेत** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय सभागृहाला करून दिला. त्यानंतर सन २०२६-२७साठीच्या पुरवणी मागण्या अर्थ राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी सादर केल्या. सभापती राम शिंदे यांनी प्रमोद जठार, कृपाल तुमाने, संजय खोडके, अभिजित वंजारी आणि सुनील शिंदे यांची तालिका सभापतीपदी नियुक्ती केली. त्यानंतर पद्मविभूषण आशा भोसले, पद्मभूषण सुमन कल्याणपूर, माजी आमदार भाऊराव देशमुख आणि सुरेशकुमार जेथलिया यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात एकंदर ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर सादर करण्यात आल्या. यात सर्वाधिक, २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी करण्यात आली आहे. त्याखालोखाल १० हजार ७ कोटी १० लाख रुपयांची तरतूद केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत बिनव्याजी कर्जासाठी केली आहे. विकसित भारत जी-राम-जी योजनेसाठी केंद्र आणि राज्याचा हिस्सा ७ हजार ३६७ कोटी ३२ लाख रुपये इतका आहे, तर सिंहस्थ कुंभमेळ्याचं नियोजन आणि अंमलबजावणीसाठी ३ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद आहे. सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाच्या २२ हजार १५ कोटी ४२ लाख, नगर विकास विभागाच्या १५ हजार १५२ कोटी ४३ लाख, तर उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाच्या १४ हजार ७६० कोटी ४८ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांचा यात समावेश आहे.

**<><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातले ६ खासदार आज एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती शिवसेना नेते आणि राज्य सरकारमधले मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. मुंबईत विधान भवन परिसरात ते वार्ताहरांशी बोलत होते.

- **होल्ड - सरनाईक बाइट**

संजय देशमुख, संजय जाधव, नागेश पाटील अष्टीकर, ओमराजे निंबाळकर, संजय दीना पाटील आणि भाऊसाहेब वाकचौरे हे ते खासदार आहेत, अशी चर्चा आहे. या खासदारांच्या प्रवेशाच्या मुद्द्यावरुन माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी टीका केली आहे. ते म्हणाले.

**होल्ड - आदित्य बाइट**

दरम्यान, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे शनिवारपासून ३ दिवस यवतमाळ, वाशिम, हिंगोली, परभणी, धाराशिव आणि शिर्डीत या लोकसभा मतदार संघांचा दौरा करणार आहेत. याच मतदारसंघातले त्यांच्या पक्षातले खासदार एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश आहेत.

**<><><><>**

मुंबईत बेस्ट उपक्रमातल्या कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी पुकारलेला बेमुदत संप काल मागे घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल कर्मचारी संघटनांबरोबर झालेल्या बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सचिन अहिर, मुरजी पटेल, तसंच महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, बेस्ट उपक्रमाच्या महाव्यवस्थापक सोनिया सेठी उपस्थित होते. पुढचा सविस्तर वेतन करार होईपर्यंत बेस्ट मधल्या कायम स्वरूपी कर्मचाऱ्यांना दरमहा तीन हजार रुपये तर कंत्राटी कर्मचाऱ्यांना दरमहा दोन हजार रुपये वेतनवाढ दिली जाईल. प्रलंबित देय अंशदानाची रक्कम चालू आर्थिक वर्षात दिली जाईल, हे, आणि इतर मुद्दे मान्य झाल्यावर संप मागे घेतल्याचं संपकरी संघटनांनी जाहीर केलं.

**<><><><>**

नीट फेरपरीक्षेत पुन्हा पेपर फुटल्याच्या वृत्ताचा एनटीए, अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं इन्कार केला आहे. नीट फेरपरीक्षा २०२६ चा पेपर टेलिग्राम या समाजमाध्यम मंचावर परीक्षेआधी फुटल्याची चर्चा होती. मात्र कालची परीक्षा सुरक्षित आणि गैरप्रकारमुक्त वातावरणात पार पडल्याचं एनटीएने म्हटलं आहे. या प्रकरणी जबाबदार व्यक्तींविरोधात कारवाई केली जाईल. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र आणि इतर यंत्रणांच्या मदतीने या प्रकाराचा तपास सुरु आहे. विद्यार्थी आणि पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, कोणतीही माहिती नीट परीक्षेच्या (www.neet.nta.nic.in) या संकेतस्थळावर पडताळून पहावी असं आवाहन एनटीएने केलं आहे.

**<><><><>**

नैऋत्य मोसमी पावसानं आज तळकोकणातून आगेकूच करत कोकण, पश्चिम महाराष्ट्राच्या पुढच्या काही भागापर्यंत मजल मारली. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, सातारा, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि पुणे जिल्ह्याचा काही भाग, तसंच मराठवाड्यातल्या काही जिल्ह्यांमध्ये तो सक्रीय झाला आहे.

**<><><><>**